MHGO060010512024

**म. कौ. हिं. का.अर्ज क्र– २९/२०२४**
मनिषा+ २ वि. फिरोज + १

**आदेश नि. क्र. २ खाली**
**(आदेश पारीत दिनांक ११.०२.२०२६)**

अर्जदाराने सदरचा अर्ज अंतरिम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) अर्जदार क्र. १ ने अर्जात असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ ची विधीवत कायदेशीर लग्नाची पत्नी असून दोघांचा विवाह दिनांक २९.०५.२०१६ रोजी मौजा कनेरी/केशोरी येथे अर्जदाराचे माहेरी समाजातील जातीधर्माच्या रितीरिवाजानुसार संपन्न झाले असून लग्न संबंध आजही कायम आहे व या लग्नसंबंधातून अर्जदार क्र. १ हिला गैरअर्जदार क्र. १ पासून पहीला मुलगा नामे रेहान व दुसरा मुलगा नामे दक्ष हा झालेला आहे. अर्जदार लग्न झाल्यानंतर गैरअर्जदारांकडे मौजा मळेघाट येथे लग्नात मिळालेले आंदणाच्या भेटवस्तु व दागदागिने घेवून नांदण्यास गेली. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदारांच्या घरी नांदायला गेली असता तिने गैरअर्जदार क्र. १ ची पत्नी म्हणून आपल्या संपूर्ण जबाबदा–या योग्यप्रकारे पार पाडल्या व तिने आपले पत्नीचे कर्तव्य योग्यप्रकारे निभावले.

३) अर्जदार क्र. १ ने पुढे असेही कथन केले आहे की, परंतु मागील तीन वर्षापासून गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र. १ हिला तु मला पसंत नव्हतीस, तुझ्यापेक्षा चांगली बायको मला मिळाली असती अशाप्रकारे बोलून गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार क्र. १ ला शारीरीक व मानसिक त्रास देणे सुरु केले. गैरअर्जदार क्र. १

हा नेहमी अर्जदार क्र. १ हिला शुल्लक शुल्लक घरगुती कारणांवरुन मारझोड करीत होता. तसेच गैरअर्जदार क्र. १ याचे वैशाली मोटघरे नावाच्या महीलेशी विवाहबाहय संबंध असल्याने व ती गैरअर्जदार क्र. १ च्या मोबाईलवर व्हॉट्सअपव्दारे मॅसेज करीत असल्यामुळे अर्जदार क्र. १ हिला गैरअर्जदार क्र. १ चे वैशाली मोटघरे सोबत संबंध असल्याचे माहीत झाले. अर्जदार क्र. १ हिने याबाबत गैरअर्जदार क्र. १ ला विचारले असता गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र. १ व मुलांशी अबोल्याने राहत होता व अर्जदारांकडे कोणत्याही प्रकारे लक्ष देत नव्हता. तसेच मला घटस्फोट दे मला तुझ्यासोबत रहायचे नाही तसेच मुले देखील माझे नाहीत असा म्हणत होता.

४) अर्जदार क्र. १ ने पुढे असेही कथन केले आहे की, जुन २०२३ मध्ये अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदार क्र. १ ला वैशाली मोटघरे या महीलेशी बोलतांना हटकले असता गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र.१ला बेदमपणे मारहाण केली. त्यामुळे अर्जदार क्र. १ हिस तिचे मामाने माहेरी नेले. अर्जदार क्र. १ ही काही दिवस माहेरी राहील्यानंतर गैरअर्जदार क्र. १ हा तिचे माहेरी कनेरी येथे आला व अर्जदार हिचेशी तिथे सुध्दा भांडण केले. अर्जदार क्र. १ ही पुन्हा ऑक्टोंबर २०२३ मध्ये गैरअर्जदाराकडे नांदायला गेली. तरी परंतु गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराशी चांगल्याप्रकारे वागत नव्हता. त्यानंतरही अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदारांसोबत नांदत राहीली. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ हा दिनांक ०८.०५.२०२४ रोजी वैशाली मोटघरे हिच्यासोबत पळून गेला. त्यामुळे अर्जदार हिने लाखांदुर पोलिस स्टेशन येथे दिनांक १२.०५.२०२४ रोजी तक्रार दाखल केली तसेच गैरअर्जदार क्र. १ हा वैशाली मोटघरे या महीलेशी पळून गेल्यानंतर गैरअर्जदार क्र. २ ही मला घरात राहू नको, तुझा व तुझ्या मुलांचा जिम्मा घेतला नाही, तु आपल्या माहेरी निघून जा, मी तुझा सांभाळ करु शकत नाही म्हणून अर्जदार क्र.१ शी भांडण करीत होती.

५) गैरअर्जदार क्र. १ हा वैशालीसोबत पळाल्यानंतर अर्जदार क्र. १ ही

मुलांच्या भविष्याचा विचार करुन काही दिवसांपर्यंत आपल्या सासरी मळेघाट येथे राहीली. अर्जदार क्र. १ हिने दिलेल्या पोलिस स्टेशन लाखांदुर च्या तक्रारीच्या अनुषंगाने गैरअर्जदार यांचा शोध घेवून पोलिस स्टेशन लाखांदुर येथे गैरअर्जदाराला बोलाविण्यात आले होते. त्यावेळी गैरअर्जदार हा वैशालीसोबत पोलिस स्टेशन लाखांदुर येथे दिनांक १६.०७.२०२४ रोजी हजर झाला परंतु गैरअर्जदार हा वैशाली हिला सोडायला तयार नसल्यामुळे व वैशाली गैरअर्जदार फिरोज याला सोडायला तयार नसल्यामुळे अर्जदार क्र. १ हिला गैरअर्जदारांकडून होत असलेला शारीरीक व मानसिक त्रास सहन न झाल्यामुळे तिला जुन २०२४ पासून नाईलाजाने आपल्या माहेरी दोन्ही मुलांना सोबत घेवून आश्रय घ्यावा लागला आहे. अर्जदार क्र. १ हिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही तसेच मोठा मुलगा शिक्षण घेत असून लहान मुलगा याचा सुध्दा औषधोपचार व उदरनिर्वाह अर्जदार क्र. १ हिला करावे लागत आहे.

६) अर्जदार क्र. १ ने पुढे असेही कथन केले आहे की, गैरअर्जदार यांची मौजा मेळघाट येथे डबल फसलीची शेती असून त्या शेतीतून त्याला वर्षाकाठी २ ते ३ लाख रुपयांचे उत्पन्न होत असतो तसेच मळेघाट येथे मोठे स्लॉबचे घर आहे तसेच गैरअर्जदार क्र. १ हा नागपूर येथे खाजगी कंपनीमध्ये काम करीत असून त्यातून तो दरमहीन्याला १५,०००/– रुपये कमवितो. एकंदरीत गैरअर्जदाराची परीस्थिती मजबूत व सधन आहे. म्हणून अर्जदारांनी रु. ८,०००/– दरमहा अंतरीम पोटगीची रक्कमेची मागणी केलेली आहे.

७) गैरअर्जदाराने त्याचे उत्तर निशाणी क्र.१० वर दाखल केले आहे. गैरअर्जदार क्र. १ ने असे कथन केले आहे की, गैरअर्जदाराचे आई वडील यांच्यासोबत अर्जदार ही कधीही बोलत नव्हती व त्यांचे कुठलेही कामे जेवण वाढने, कपडेलत्ते धुणे व ईतर कामे अर्जदाराने कधीही केलेले नाही. यातच गैरअर्जदाराच्या वडीलांवर मानसिक धक्का लागल्याने गैरअर्जदाराच्या वडीलांना ह्दय विकाराचा

झटका येवून मृत्यु झाला. अर्जदार ही गैरअर्जदार यांच्या कोणत्याही नातेवाईकांसोबत बोलत नव्हती व त्यांचा मानसन्मान सुध्दा करीत नव्हती त्यामुळे गैरअर्जदाराच्या घरी त्याचे कोणतेही नातेवाईक येत नसल्याने अर्जदारामुळे गैरअर्जदाराचे नातेवाईकासोबतचे संबंध संपुष्टात आले.

८) गैरअर्जदाराने पुढे असे कथन केले की सन २०२४ मध्ये गैरअर्जदार हा घरी नसतांना अर्जदार हिने तिचा मामा घनश्याम चवरे यांना मळेघाट येथे बोलावून त्यांच्यासोबत दोन्ही मुलांना घेवून कनेरी / केशोरी येथे घनश्याम चवरे यांच्या घरी निघून गेली. अर्जदार ही कधीही गैरअर्जदारासोबत मागील तीन वर्षापासून एकत्र वैवाहीक जिवन जगलेली नाही. अर्जदार व गैरअर्जदाराचे तीन वर्षापासून कोणतेही वैवाहीक संबंध प्रस्थापित झालेले नाही. गैरअर्जदाराने स्वतः जावून व अनेकदा फोनव्दारे अर्जदारास नांदण्यास येण्याची विनंती केली तरी सुध्दा अर्जदार ही गैरअर्जदाराकडे नांदण्यास आली नाही. गैरअर्जदार क्र. १ हा शेतीचे मजुरीचे काम करीत असतो. महीन्यातून ५ ते १० वेळा रोजंदारीचे कामे मिळत असतात. त्यापासून तो महीन्यापोटी १ ते २ हजार रुपये कमवित असतो. करिता, गैरअर्जदाराने सदर अर्ज खारीज करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

९) अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्ज व अभिलेखावरील कागदपत्रांवरुन खालील मुद्दे उपस्थीत झालेले आहेत. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| **अनु.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदाराने तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द करते काय ? | होय. |
| २. | अर्जदार क्र. १ ते ३ हे अंतरीम | होय, गैरअर्जदारकडुन अर्जदार क्र. |

| | | |
|---|---|---|
| | पोटगी मिळण्यास पात्र आहेत का ? असल्यास किती ? | १ ही रक्कम रुपये २०००/– व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी रुपये १०००/– प्रतीमहा अंतरीम पोटगी म्हणुन मिळण्यास पात्र आहे. |
| ३. | काय आदेश? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ करीता

१०) अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदाराची पत्नी व अर्जदार क्र. २ व ३ हे त्यांचे मुल आहेत. अर्जदार क्र. १ हीने अर्जात असे कथन केले आहे की, गैरअर्जदार हा तिला नेहमीच त्रास देत असतो. गैरअर्जदार क्र. १ हा नेहमी अर्जदार क्र. १ हिला शुल्लक शुल्लक घरगुती कारणांवरुन मारझोड करीत होता. तसेच त्याचे वैशाली मोटघरे नावाच्या महीलेशी विवाहबाहय संबंध असल्याने त्याने त्याच्या पत्नी व मुलांकडे कधीही लक्ष दिले नाही. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामधील नातेसंबंध लक्षात घेता त्यांच्यामध्ये 'कौटुंबिक नातेसंबंध' असल्याचे दिसते. अभिलेखावरुन अर्जदार कलम २ (अ) प्रमाणे 'पिडीत महीला' असल्याचे दिसते. तसेच गैरअर्जदाराने अर्जदाराला मानसिक व शारिरीक त्रास देवून कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

### मुद्दा क्र. २ करीता

११) अर्जदाराच्या कथनानुसार गैरअर्जदार यांची मौजा मेळघाट येथे डबल फसलीची शेती असून त्या शेतीतून त्याला वर्षाकाठी २ ते ३ लाख रुपयांचे उत्पन्न होत असतो तसेच मळेघाट येथे मोठे स्लॉबचे घर आहे तसेच गैरअर्जदार क्र. १ हा नागपूर येथे खाजगी कंपनीमध्ये काम करीत असून त्यातून तो दरमहीन्याला १५,०००/– रुपये कमवितो. म्हणून अर्जदाराने रु. ८,०००/– दरमहा अंतरीम पोटगीची रक्कमेची मागणी केलेली आहे. अर्जदार ही तिच्या मुलांसोबत तिचे

वडिलांकडे राहत आहे. तिच्याकडे उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही. याउलट गैरअर्जदाराने असे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ हा रोजनदारीचे काम करतो. त्याला कधी काम मिळते कधी काम मिळत नाही.

१२) वरील चर्चेनुसार असे निष्पन्न होते की, गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदाराकडे दुर्लक्ष केले आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ वेगळे राहत आहे. तसेच अर्जदार क्र. १ ही स्वतःचा व तिच्या मुलांचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. गैरअर्जदार क्र. १ वर पती म्हणून अर्जदार क्र. १ हीला व पिता म्हणून अर्जदार क्र. २ व ३ यांना सांभाळण्याची कायदेशीर तसेच नैतीक जबाबदारी आहे. परंतु अर्जदार क्र. १ माहेरी गेल्यापासून गैरअर्जदाराने अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची कोणतीही तरतुद केलेली नाही. याठिकाणी हे नमुद करणे आवश्यक आहे की, गैरअर्जदार क्र. १ हा शारिरीकदृष्टया सुदृढ आहे. गैरअर्जदार यांच्या शारिरीक परिस्थितीचा विचार करता त्यास प्रतिदिन रु.३००/– प्रमाणे अकुशल कामगार म्हणून सहज मजूरी उपलब्ध होवू शकते. म्हणून माझ्या मते गैरअर्जदार क्र. १ ची अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची रककम पुरविण्याची ऐपत आहे व अर्जदार ही उदरनिर्वाह खर्च मिळण्यास पात्र आहेत. म्हणून मी गैरअर्जदाराची आर्थिक परिस्थिती, सद्ययाची महागाई, अर्जदाराची सामाजिक व राहती परिस्थिती, दैनंदिन खर्चाकरीता अर्जदाराला लागणारा खर्च या सर्व बाबी लक्षात घेता अर्जदार क्र. १ हिला २०००/– रुपये प्रतिमहीना व अर्जदार क्र. २ व ३ यांना रु. १०००/– प्रत्येकी प्रतिमाह अंतरिम पोटगी मंजुर करणे उचीत व न्यायोचीत ठरेल. वरील सर्व बाबींचा विचार करता मी मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ करीता</u>**

१३) अर्जदाराने तिचे हक्क प्रथमदर्शनी सिध्द केले आहे. अर्जदाराची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता खालील अंतरिम आदेश पारीत करणे संयुक्तीक ठरते. मुद्दा क्र.

३ च्या उत्तराप्रित्यर्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१] अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२] गैरअर्जदार क्र. १ यास आदेशीत करण्यात येते की, अर्जदार क्र. १ हिला अंतरीम पोटगी रु.२०००/- व अर्जदार क्र. २ व ३ यांना अंतरीम पोटगी प्रत्येकी रु.१०००/- प्रतिमहा सदर अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून ते मुळ अर्जाच्या निकालापर्यंत देण्यात यावी.

३] सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना विनाशुल्क देण्यात यावी.

NEHA VIJAY SHAHU

Digitally signed by NEHA VIJAY SHAHU
Date: 2026.02.11 17:32:15 +0530

(एन. व्ही. साहू)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
अर्जुनी/मोरगांव

दि. ११.०२.२०२६